


# पारनेर दर्शन




वर्ष ३ अंक ७, रविवार १७ नोव्हेंबर २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# विखे पिता–पुत्रांनी पाणी योजनेसह विकास कामे रोखली!

पारनेर : विशेष प्रतिनिधी

**पारनेर शहराच्या पाणी योजनेसह कोटयावधी रूपयांची विकास निधी पालकमंत्री राधाकृष्ण विखे व सुजय विखे यांनी राजकीय आकासातून रोखल्याचा गंभीर आरोप पारनेरचे नगराध्यक्ष–उपनगराध्यक्ष तसेच नगरसेवकांनी शनिवारी पुराव्यांसह केला.**

लोकसभा निवडणूकीतील खा. नीलेश लंके यांची संभाव्य उमेदवारी डोळयापुढे ठेऊन विखे पिता पुत्रांनी शहरासह मतदारसंघातील कामांमध्ये खोडा घालण्याचा प्रयत्न केला. लंके यांची उमेदवारी जाहिर झाल्यानंतर विविध विकास कामांच्या वर्क ऑर्डर रोखण्यात आल्याचा आरोप यावेळी करण्यात आला.

पत्रकार परिषदेस यावेळी नगराध्यक्ष नितीन अडसुळ, उपनगराध्यक्षा जायदा शेख, सुरेखा भालेकर, योगेश मते, डॉ.विद्या कावरे, डॉ. बाळासाहेब कावरे, विशाल शिंदे, ऋषीकेश गंधाडे,विजय डोळ, प्रियंका औटी, हिमानी नगरे, निता ठुबे, भुषण शेलार, सुप्रिया शिंदे, रा. या.औटी, वैभव गायकवाड , विलास सोबले, राजू चेडे, अक्षय चेडे, सायली चेडे, आनंदा औटी, चंद्रकांत कावरे, बाळासाहेब नगरे, बाबा पठारे, ॲड.मंगेश औटी, सचिन नगरे, राजू शेरकर, राजू तराळ, अतुल शेटे, प्रशांत औटी, जाकीर शेख,अजिम शेख, स्वप्निल देशमुख,संदीप मते, दादा शेटे,बबलु औटी,रामदास पठारे,बापू पुजारी यांच्यासह मान्यवर यावेळी उपस्थित होते.

## पारनेरच्या नगरसेवकांचे पुराव्यांसह गंभीर आरोप



■ पाणी योजनेच्या मंजुरीसाठी नगरपंचायत पदाधिकाऱ्यांनी शरद पवार यांच्यासह घेतलेल्या मुख्यमंत्रयांच्या भेटीचा फोटो पत्रकार परिषदेत सार्वजनीक करण्यात आला.

### पारनेर शहरासाठी २६५ कोटींचा निधी

खा. नीलेश लंके यांना कामासाठी दोन वर्षांचा कालावधी मिळाला. तालुक्यात २ हजार कोटींचा निधी देतानाच २६५ कोटींचा भरीव निधी पारनेर शहरासाठी त्यांनी दिला. अनेक कामे पुर्ण झाली असून काही कामे सुरू आहेत. लोकसभेत नीलेश लंके यानी सुजय विखे यांचा पराभव केला म्हणून राधाकृष्ण विखे यांनी त्रास देण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप अर्जुन भालेकर यांनी केला.

### भाजपा नगरसेवकांचा निधी राहात्याला वळविला

पारनेर शहरातील भाजपाच्या नगरसेवकांनी डॉ. सुजय विखे यांनी दोन–अडीच कोटी रूपयांचा निधी देतो असे आश्वासन दिले होते. कामांच्या मंजुरीसाठी विरोधी नगरसेवकांनी नगरपंचायतचे ठराव आणण्यास सांगण्यात आले. सत्ताधाऱ्यांनीही विकास कामांना विरोध नको म्हणून ठराव दिले. जिल्हा नियोजनमधून या कामांसाठी निधीही मंजुर झाला, मात्र सुजय विखे यांच्या पराभवानंतर हा निधी राहत्याला वळविण्याचा नतद्रष्टपणा विखे पितापुत्रांनी केल्याचा आरोप अर्जुन भालेकर यांनी केला.

### त्यांचा पाठींबा पॅकेज घेऊन !

खादी ग्रामोद्योगचे व्हाईस चेअरमन राजेंद्र करंदीकर यांनी काशिनाथ दाते यांना पाठींबा दिल्याचे वृत्त प्रसारीत झाले असून ते चुकीचे आहे. करंदीकर यांच्या भुमिकेचा निषेध करतो. आम्ही राजू पांढरे, नीलेश खोडदे, शोभा शेलार ,भाऊ रासकर, अमित जाधव हे सदस्य राणी लंके यांच्यासोबत आहोत. व्हाईस चेअरमन यांनी पॅकेज घेऊन पाठींब्याचे पत्र दिले असेल. भिमशक्ती संघटनेने भाळवणीच्या सभेत प्रल्हाद शिंदे यांनी राणी लंके यांना पाठींबा दिला आहे. करंदीकर आंबेडकरी जनतेची दिशाभुल करत आहे. संविधान संपविण्याचा ज्यांचा डाव आहे. त्यांना आंबेडकरी जनता मतदान करणार नाही.

अमित जाधव

### मुख्यमंत्र्यांची तयारी, त्यातही खोडा

शहराच्या पाणी योजनेसाठी खा. नीलेश लंके यांच्या मार्गदर्शनाखाली नगराध्यक्ष नितिन अडसूळ, पाणीपुरवठा समितीचे सभापती योगेश मते यांनी पाठपुरावा केला. खा लंके यांनी या योजनेस मंजुरी मिळावी यासाठी खा. शरद पवार यांनाही साकडे घातले. शरद पवार यांनी पदाधिकाऱ्यांसह मुख्यमंत्र्यांची भेट घेतली. मुख्यमंत्र्यांनी लगेच मंजुरी देतो असे सांगितले मात्र पुन्हा माशी शिंकली. ७३ कोटींची योजना रोखली गेली.

### पारनेर शहरासाठी त्यांनी किती निधी दिला ?

शहरातील विकास कामे जी झाली ती आजवर कधीही झाली नाहीत. राणी लंके यांच्या विरोधातील उमेदवार बांधकाम समितीचे सभापती होते त्यांनी जेवढा निधी आणला तो सर्व निधी गटात नेला. पारनेर शहरासाठी इतर कोणत्याही निधीमधून अथवा खासदारांकडून त्यांनी एक रूपयांचाही निधी आणला नाही.

अर्जुन भालेकर, जिल्हा उपाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस

### खा. लंके यांनी शब्द पाळला

लंके यांनी नगरपंचायत पदाधिकारी निवडणूकीत दिलला शब्द पाळला. आम्ही मा. विजय औटी यांचे कार्यकर्ते होतो. सत्ताधारी गटाकडे ११ नगरसेवक होते. विरोधी बाकावर ६ नगरसेवक होते. अजित पवार हे शरद पवार यांची साथ सोडून गेल्यानंतर उध्दव ठाकरे शिवसेनेच्या ५ नगरसेवकांनी भाजपामध्ये जाण्याचा निर्णय घेतला. त्याच वेळी विजय औटी यांनी महाविकास आघाडीचा धर्म पाळण्याच्या सुचना दिल्या होत्या. त्यानुसार आम्ही लंके यांच्यासोबत गेलो. पाठींब्याच्या बदल्यात त्यावेळी खा. लंके यांनी त्यांनी उपनगराध्यक्षपद दिले. दिलेला शब्द पाळला.

जायदा राजू शेख
उपनगराध्यक्षा

### महसूल विभागाने तांत्रिक अडचणी निर्माण केल्या

शहर विकास आराखडा झाल्यानंतर बगिचासाठी ४ कोटी, फायर ब्रिगेड इमारत, ९ कोटींची व्यापारी संकुलाचे काम अडविण्यात आले. त्यासाठीच्या जागा तांत्रिकदृष्टया महसूल विभागाकडे असल्याने या जागांचे हस्तांतरण राधाकृष्ण विखे यांनी रोखले. १२ कोटींची कामे शहराच्या वरची वेस भागाचा विकास होऊ नये यासाठी विखे यांनी जाणीवपुर्वक प्रयत्न केले. ग्रामीण रूग्णालयाचे श्रेणीवर्धन करून उपजिल्हा रूग्णालय उभारण्यासाठी खा. नीलेश लंके यांनी ८५ कोटींचा निधी मंजुर केला, त्यातही राजकीय अडवणूक करीत महसूल विभागाची परवानगी विखे यांनी रोखल्याचा आरोप डॉ. बाळासाहेब कावरे यांनी केला.

### अजित पवारांनी सांगितले की पारनेरला २ हजार कोटींचा निधी !

अजित पवार यांनी दोन हजार कोटींचा निधी दिल्याचे सांगितले आहे. त्यामुळेच आम्ही नीलेश लंके यांच्यासोबत काम करत आहोत. पारनेर नगरपंचायतमध्ये नीलेश लंके यांचे सहकारी अतिशय चांगले काम करत आहेत. राणी लंके यांचे संघटन कौशल्य चांगले आहे. जिल्हा परिषदेच्या माध्यमातून त्यांनी काम केले आहे. सुख दुःखात सहभागी होणारे हे कुटूंब आहे.

नीलेश खोडदे
शिवसेना शहर प्रमुख

### पाणी योजना अडविणाऱ्यांना धडा शिकविणार

शरद पवार यांनी महिलांना ५० टक्के आरक्षण दिले. त्याच धोरणातून राणी लंके यांना उमेदवारी देण्यात आली आहे. लंके परीवार २४ तास वंचित घटकांसाठी काम करणारे कुटूंब आहे. गरीब जनतेला संकटात मदतीसाठी हे कुटूंब नेहमीच अग्रभागी असते. पाच वर्षे झोपा काढणारे काही अपक्ष भुछत्राप्रमाणे उभे राहिले आहेत. एकीकडे सतत लोकांसाठी काम करणाऱ्या राणी लंके दुसरीकडे झोपा काढणारे उमेदवार असे या निवडणूकीचे चित्र आहे. पालकमंत्र्यांनी विविध योजना आडवून अन्याय केला. शेतकऱ्यांच्या मालाला भाव नाही. लाडक्या बहिणींच्या नावाखाली पंधराशे रूपये दिले दुसरीकडे शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यात सत्ताधाऱ्यांना यश आले नाही. राणी लंके यांची उमेदवारी ही घराणेशाही नाहीच. सक्षम महिलेस संधी म्हणून शरद पवारांनी त्यांना संधी दिली आहे. पारनेरची पाणी योजना अडविणारांना धडा शिकविल्याशिवाय पारनेरकर स्वस्थ बसणार नाहीत.

रा.या.औटी

### पाणी योजनेच्या मंजुरीसाठीचा प्रवास

**■ योजनेसाठी जागांची उपलब्धता**

पाणीपुरवठा योजनेसाठी जागेची आवष्यकता असते.सर्वेक्षणानंतर जलशुध्दीकरण्यासाठी आनंदा औटी यांनी ३२ गुंठे जागा विनामोबदला दिली. प्रविण कावरे यांनी बुगेवाडी येथे ४ गुंठे जागा दिली. पंपींग स्टेशनच्या जागेसाठी ढवळपुरीचे सरपंच भागा गावडे यांनी खा. नीलेश लंके यांच्या सुचनेनंतर जागा उपलब्ध करून दिली. तेथील थोरात या योजनेशी कोणताही संबंध नसताना चांगल्या कामासाठी ६ गुंठे जागा दिली. पाणी योजनेची ४७ किमीची पाईपलाईन असून त्यासाठी नगरपंचायतच्या नावावर करण्यात आलेल्या जागांच्या उताऱ्यांसह पाणीपुरवठा समितीचे सभापती योगेश मते यांनी माहीती दिली.

**■ राजकीय आकासातून योजनेत त्रृटी**

पाणी योजनेचा प्रस्ताव सादर करण्यात आल्यानंतर राजकीय आकसातून नोव्हेंबर २०२२ मध्ये ३४ त्रृटी काढण्यात आल्या. या त्रृटींची पुर्तता करून ३१ मार्च रोजी पुन्हा प्रस्ताव सादर करण्यात आला. त्रास देण्याच्या हेतूने पुन्हा २८ त्रृटी काढण्यात आला त्याचीही पुर्तता झाल्यानंतर तीन ते चार महिने कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. त्यानंतर जीवन प्राधिकरणच्या कार्यालयात नाशिक येथे खा. लंके यांच्या यांच्या उपस्थितीत बैठक झाली.

**■ तपासणी शुल्क जमा, योजनेला तांत्रिक मंजुरी**

जीवन प्राधिकरणच्या कार्यालयात खा. लंके यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीनंतर १ जुन २०२३ रोजी तांक तपासणी शुल्क भरण्याचे पत्र देण्यात आले. २ जुन रोजी दुसऱ्याच दिवशी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला ७२ लाख ८७ हजार रूपयांचे शुल्क धनादेशाद्वारे जमा करण्यात आले. त्यानंतर जुन महिन्यातच तांत्रीक मंजुरी मिळाली. कामाचे अंदाजपत्रक वाढल्याने जुलै २०२३ मध्ये सुधारीत तांत्रिक मंजुरी देण्यात आली.

**■ लंके यांना श्रेय नको म्हणून पुन्हा त्रृटी**

या योजनेस केवळ प्रशासकीय मान्यता देण्याचे सोपस्कार शिल्लक असताना ३ ऑगस्ट रोजी पुन्हा ४ त्रृटी काढण्यात आल्या. ११ऑगस्ट रोजी या त्रृटींची पुर्तता करण्यात आली. पारनेर तालुका कृष्णा खोऱ्यात आहे. पाण्याच्या दृष्टीने कृष्णा खोरे त्रृटीचे आहे. तर गोदावरी खोऱ्यात विपुल पाणी आहे. मात्र पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्या हटवादी भूमिकेमुळे त्रृटी काढण्यात आल्याने विसापुर तलावात पाणी उपलब्ध नसल्याचे कुकडी विभागाचा अभिप्राय, घोड, काळू धरणातही पाणी नाही. तसा अहवालही सादर करण्यात आला. केवळ नीलेश लंके यांना या मोठया योजनेचे श्रेय नको म्हणून विखे पितापुत्राकडून वांरवार त्रास दिला गेला.

**■ समितीच्या यादीत समावेशानंतर पुन्हा त्रृटी**

२ फेब्रुवारी २०२४ रोजी राज्यस्तरीय तांत्रिक समितीने आदेशान्वये ५३ नगरपंचायतींच्या पाणी योजनांचा प्रशासकीय मंजुरीसाठी समावेश करण्यात आला. त्यात पारनेरच्या योजनेचाही समावेश होता.तांत्रिक समितीने समावेश केल्यानंतही पारनेरच्या योजनेत पुन्हा गोदावरीच्या पाणी आरक्षणाचा दाखला नसल्याची त्रृटी काढण्यात आली. १.४९ दशलक्ष घनमीटर इतक्या मोठया प्रमाणावर पाणी मागणीस मुळा धरणातून पाणी उचलण्यास परवाणगी देण्यात आली.

**■ ५३ पैकी ५२ योजनांना मंजुरी, पारनेर वगळले**

पारनेर नगर पंचायतीने सर्व त्रृटींची पुर्तता करण्यात आल्यानंतरही ५३ पैकी ५२ पालिकांच्या पाणी योजनांना मंजुरी देण्यात आली. राजकीय हेतूने केवळ खा .नीलेश लंके यांची योजना म्हणून प्रशासकीय मान्यता देण्यात आली नाही. मुख्यमंत्र्यांवरही पालकमंत्री यांनी दबाव आणला.

योगेश मते
सभापती, पाणीपुरवठा समिती

### श्रेय मिळू नये म्हणून आटापिटा

नगर पंचायत सत्ता स्थापनेनंतर लंके यांनी शहराचे सर्वेक्षण केले. त्यानुसार विकास कामांचे नियेजन करण्यात आले आहे. विकास आराखडा, पाणी योजना, उपजिल्हा रूगणालय, न्यायालय इमारत आदी मोठया कामांना मंजुरी ही लंके यांची उपलब्धी आहे. या कामांचे श्रेय लंके यांना मिळू नये यासाठी विखे पिता पुत्रांनी आटापिटा करीत सत्तेचा गैरवापर केल्याच आरोप भालेकर यांनी केला.

### राणी लंके पालकमंत्री होणार !

लोकसभा निवडणूकीमध्ये महाविकास आघाडीला साथ देण्याचा निर्णय पक्ष श्रेष्ठींकडून घेण्यात आला. त्यानुसार आम्ही नीलेश लंके यांच्या पाठीशी उभे राहण्याचा निर्णय घेतला. अनेक शिवसैनिक लंके यांच्या पाठीशी उभे होते. लंके यांनी धनशक्तीचा पराभव केला. खासदार आणि आमदार एकाच विचाराचा असावा म्हणून आम्ही राणी लंके पाठीशी उभे आहोत. त्यांना आपण जितके मोठे मताधिक्य देउ तितके मोठे मंत्रीपद मिळणार आहे. पालकमंत्रीपदही मिळणार आहे.

राजू शेख, शिवसैनिक

### विखे यांनी कामे रोखली

कचरा व्यवस्थापनांतर्गत प्रकल्पासाठी खा.नीलेश लंके यांनी मोठा निधी मंजुर केला. विविध योजनांसाठीही निधी मंजुर करण्यात आला असून भेदभाव न करता सर्वांना निधी देण्यात आला. सुजय विखे यांनी माझया प्रभागातील १ कोटींची कामे अडविली. ७५ वर्षानंतर महिला आमदार होण्याची संधी असून महिलांनी त्यांच्या पाठीशी महिलांनी उभे रहावे. राणी लंके या विजयी तर होणार आहेत. त्या राज्याच्या मंत्रीमंडळात मंत्री होणार असून त्यांचे मताधिक्य कसे वाढेल यासाठी प्रयत्न करायचे आहेत.

प्रियंका औटी

### तर मी राजीनामा देईल

विरोधी प्रभागात कामे होत नसल्याचा आरोप राजकीय द्वेशातून करण्यात येतो. खासदार नीलेश लंके हे कोणताही भेदभाव करत नाहीत. सलग दोन वर्षे दुष्काळ होता. अडीच–तीन महिने टँकरने पाणी पुरवठा करण्यात आला. टँकर मिळाला नाही असे एकही उदाहरण नाही. कोणी दाखवून दिले तर मी राजीनामा देतो. ५०० पथदिवे समप्रमाणात प्रभागांमध्ये बसविण्यात आले.

योगेश मते

### पारनेरचा इतिहास

आजवर कोणीही अपक्ष विजयी झालेले नाही.अपक्षांना मते देऊन ते वाया घालू नका निश्चित विजयी होणाऱ्या राणी लंके यांना मते द्या. आघाडीच्या उमेदवारामागे उभे राहण्याचे आवाहन रा.या.औटी यांनी केले.

### त्यांना १५ वर्षात गाडू मार्ग करता आला नाही !

जिवंत नागरीक म्हणून मी भूमिका मांडतो आहे. ज्यांच्याकडे काही राहीले नाही ते विरोधकांबरोबर आहेत. दोन अडीच वर्षांपूर्वी खा. लंके यांच्याशी संपर्क केला. पारनेरची स्थानिक व्यक्ति १५ वर्षे आमदार असतानाही शहराचे ग्रामदैवत असलेल्या भैरवनाथांचा गाडू मार्ग होऊ शकला नाही. खा. नीलेश लंके यांच्याकडे ही मागणी केल्यानंतर भुषण शेलारांच्या पाठपुराव्यानंतर हा प्रश्न मार्गी लागला. या रस्त्यासाठी १ कोटीचा निधी देण्यात आला होता. या रस्त्यावर स्ट्रीट लाईटचेही काम पुर्ण झाले आहे. भैरवनाथ मंदिरात दिलेला शब्द खा. लंके यांनी पुर्ण केला. हुषार, तत्वज्ञानी म्हणणारे, विधिमंडळाला कायदेमंडळ म्हणणारे काही करू शकत नाही.

ॲड.मंगेश औटी

### त्यांना नीलेश लंके यांची काविळ झालीय !

श्रेयवादाची लढाई करू नका असे खासदार लंके हे नेहमी सांगतात. विरोधी नगरसेवकांचे ठराव एकमताने मंजुर केले गेले हा इतिहास लंके यांच्या नेतृत्वाखालील नगरसेवकांनी केला. डॉ. सुजय विखे पराभवानंतर हा निधी राहात्याला वळविला. अर्बन पीएचसीला मंजुरी. त्यासाठी शहरात असलेल्या इमारतीचा ताबा न देता अडवणूक करण्याची भूमिका घेतली. त्यांना नीलेश लंके यांची काविळ झालीय.

डॉ. बाळासाहेब कावरे

### रामाच्या नावावर मते मागतात, राम मंदिराचा सभामंडप अडवितात !

शहरात न झालेली कामे करण्यात आली. लोणी ते ठोंबरे वस्ती हा रस्ता पुर्ण करण्यात आला. स्वातंत्र्यापासून अनेक पुढारी झाले, आश्वासने देण्यात आली मात्र कोणीही हा रस्ता केला नाही. खा. लंके यांनी चार रस्ते दिले. विरोधक प्रभू रामाच्या नावावर मते मागतात मात्र बुगेवाडी येथील राम मंदिराच्या सभामंडपाचे काम आडविण्यात आले. मंजुर कामाची वर्क ऑर्डर देऊ नका असे पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना सांगत सत्तेचा गैरवापर केला. पारनेरकरांनी भावनिक होऊ नये. विकास करणाऱ्या लंके दाम्पत्याच्या मागे उभे रहा.

योगेश मते, पाणीपुरवठा सभापती

### विखे यांनी डॉ. आंबेडकर स्मारकाचे काम रोखले

१ कोटी १० लाख रूपयांचा निधी विखे यांनी आडविला. या निधीमधून आंबेडकर स्मारक उभारण्यात येणार आहे. पालकमंत्र्यांच्या एका सहीमुळे हे काम रोखले गेले. महाराष्ट्रात असे कुठेही घडले नाही, ज्या ठिकाणी डॉ. आंबेडकर यांचे स्मारक रोखले गेले. हे स्मारक न झाल्याने तिथे अभ्यासिका होणार होती. ती होऊ शकली नाही. सध्या ६० लाखांचे बाजार तळावरील काम सुरू आहे. ६० लाखांची अभ्यासिका सुरू होणार आहे. स्मशानभुमी वॉल कंपाउंड, चावडीसाठी १७ लाख, विजेसाठी २५ लाख, महिला जीमसाठी १२ लाखांचा निधी, नाना नानी पार्कलाही निधी. लिंगायत समाजाच्या स्मशानभुमीसाठी २५ गुंठे जागा, जामगांव, लोणी रस्त्यांची कामे सुरू आहेत. प्रभागात १६ ते १७ कोटी रूपयांची कामे माग लागली. बहुचचत लोणी व जामगांव रस्त्यांचे दर्जेदार कामे सुरू आहेत. विकास कामांसाठी राणी लंके यांच्या पाठीशी उभे रहावे.

हिमानी नगरे, नगरसेविका

### पराभवानंतर विखे यांनी मंजुर निधी वळविला

सुजय विखे यांनी प्रभागात ५० ते ६० लाख रूपयांची कामे देतो असा शब्द दिला होता. नगरपंचायतचा दाखला दिल्यानंतर १ कोटी ८१ लाखांच्या कामांना मंजुरी देण्यात आली. त्यास प्रशासकीय मान्यताही दिली. सुजय विखे यांच्या पराभवानंतर हा निधी रोखला गेला. निधी रोखल्यानंतर विखे यांची भेट घेतली असता हा निधी परत घेण्यात आल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे मी लंके यांच्यासोबत काम करण्याचा निर्णय घेतला. लंके यांनी प्रभागात काम करण्याचा शब्द दिला आहे.

ऋषीकेश गंधाडे, शिवसेना नगरसेवक

### मुस्लिम समाज लंके यांच्या पाठीशी

तालुक्यातील मुस्लिम समाजाला ५५ वर्षात मिळाला नाही इतका निधी खा. नीलेश लंके यांनी मंजुर केले. काही मंजुर कामे अडविण्यात आली आहेत. यापुढील काळात खा. लंके यांच्या निधीमधून पाच टक्के निधी देण्याची ग्वाही लंके यांनी दिली. १४ हजार मतांपैकी ९० ते ९५ टक्के मतदान घडवून आणून ते राणी लंके यांना मिळवून देणार आहोत. शाहू, फुले, आंबेडकरांच्या महाराष्ट्रात जातीयवादाला खतपाणी घातले जात असून त्यामुळेच सर्व समाज राणी लंके यांच्या पाठीशी उभा राहणार आहे.

डॉ. सादीक राजे, नगरसेवक

### त्यांनी पाणी योजनेला, रस्त्याला विरोध केला

महायुतीचे उमेदवार ३५ ते ४० वर्षे पारनेरात राहतात. पाणी योजनेसाठी त्यांनी काय केले ? या योजनेला विरोध करण्याचे काम त्यांनी केले. देवीभोयरे फाटा ते खडकी हा रस्ताही अडविण्याचे काम विरोधी उमेदवाराने केले. बापट स्मारकासाठी १० कोटींचा निधी मंजुर करण्यात आला, तो निधीही अडविला गेला. राजकीय विचारांनी प्रेरीत होऊन काम करणारे पालकमंत्री. ज्यांच्या नेतृत्वाखाली हे उमेदवार निवडणूक लढवित आहेत. विखे यांच्याकडे पालकमंत्रीपद, खासदारकी होती. पारनेर शहरासाठी त्यांनी एक रूपयांचा निधी तरी दिला का ?

# तंत्रमंत्र
विज्ञानयुगातील बितंबातम्या

# रात्रीपेक्षा दिवस का मोठा होत आहे?

**हवामान बदलामुळे माणसाला अनेक आपत्तींचा सामना करावा लागत आहे. कुठे पाणी संकट, कुठे पूर, तर कुठे भूकंप अशी सध्या जगाची परिस्थिती आहे. मात्र, आता वैज्ञानिकांच्या संशोधनात आणखी एक धक्कादायक माहिती समोर आली आहे. वैज्ञानिकांनी दिलेल्या महितीनुसार रात्रीपेक्षा दिवसच मोठा होत जाणार आहे. अनेकांच्या कदाचित हे लक्षातही आले असावे की, काही वर्षांच्या तुलनेत आता रात्र ही छोटी झाली आहे आणि दिवस मोठा झाला आहे. पुढेही हे प्रमाण वाढत जाणार असल्याची माहिती संशोधकांनी दिली आहे.**



मानवी वर्तनामुळेच हवामान बदल आणि ग्लोबल वॉर्मिंगचे संकट ओढवले आहे; ज्याचा नकारात्मक परिणाम माणसांच्या आरोग्यावर होतो आहे. हवामान बदलामुळे हृदयविकाराचा धोका तसेच मानसिक आरोग्याच्या स्थितीवर परिणाम होत आहे. आता संशोधनात समोर आलेल्या महितीनुसार वेळेवरदेखील याचा परिणाम होत आहे. हवामानातील बदलामुळे दिवस कसा मोठा होतोय? त्याचा वेळेवर काय परिणाम होत आहे? हे संकट पृथ्वीसाठी धोकादायक आहे का? याविषयी सविस्तर जाणून घेऊ.

## दिवस मोठा अन् रात्र छोटी

जेट प्रोपल्शन लॅबोरेटरी आणि ईटीएच झुरिचच्या संशोधकांनी केलेला अभ्यास प्रोसीडिंग्ज ऑफ द नॅशनल ॲकॅडमी ऑफ सायन्सेस या जर्नलमध्ये प्रकाशित झाले आहे. या अभ्यासात असे दिसून आले आहे की, ध्रुवीय बर्फाच्या वितळण्यामुळे पृथ्वीचा वेग मंदावला आहे आणि त्यामुळेच रात्रीपेक्षा दिवस मोठा होत आहे. यावर नासाच्या जेट प्रोपल्शन प्रयोगशाळेचे सह-लेखक सुरेंद्र अधिकारी यांनी 'एएफपी'ला सांगितले की, ग्रीनलँड आणि अंटार्क्टिकामधून वाहणाऱ्या पाण्यामुळे विषुववृत्ताभोवती अधिक वस्तुमान निर्माण होत आहे; ज्यामुळे पृथ्वीचे जडत्व वाढते. सोप्या भाषेत सांगायचे झाले तर ग्रीनलँड आणि अंटार्क्टिक येथे वितळणाऱ्या हिमनगामुळे पाणी विषुववृत्ताजवळील समुद्रात येते. त्यामुळे समुद्राची पातळी हळूहळू वाढत जाते. समुद्राच्या पातळीत वाढ झाल्याने पृथ्वी अधिक जड होते आणि पृथ्वीचा वेग मंदावतो. संशोधकांच्या गटाने १९०० ते २१०० या कालावधीतील अंदाजाचा अभ्यास केला. त्यात भूतकाळातील पूर्वीची स्थिती आणि हवामान बदलामुळे भविष्यावर होणारा परिणाम, याचा अभ्यास करण्यात आला. या अभ्यासात असे आढळून आले आहे की, एका दशकाहून अधिक काळापासून पृथ्वीचा वेग मंदावला आहे. हवामान बदलामुळे समुद्राच्या पातळीत वाढ झाल्यामुळे २० व्या शतकात एका दिवसाची लांबी ०.३ ते १ मिलीसेकंद दरम्यान वाढली. परंतु, गेल्या दोन दशकांमध्ये, दिवसाची लांबी प्रति दशक १.३३ मिलीसेकंद वाढली आहे. ही वाढ २०व्या शतकातील वाढीपेक्षा लक्षणीयरीत्या जास्त आहे."

## हिमनद्यांचे वितळणे पृथ्वीसाठी धोकादायक

शास्त्रज्ञांनी नोंदवले आहे की, १९०० च्या दशकाच्या सुरुवातीपासून जगभरातील अनेक हिमनद्या वेगाने वितळत आहेत. मानवी क्रियाकलापांमुळे ही आपत्तीजनक स्थिती निर्माण झाली आहे. विशेषतः औद्योगिक क्रांतीपासून कार्बन डाय ऑक्साइड आणि इतर हरितगृह वायू उत्सर्जनामुळे तापमानात वाढ झाली आहे आणि परिणामी हिमनद्या वेगाने वितळत आहेत; ज्यामुळे समुद्राची पातळी वाढत आहे. एका अभ्यासातून असे दिसून आले आहे की, येत्या काही दशकांमध्ये आपण उत्सर्जनावर उपाययोजना केल्या नाहीत तर २१०० च्या आधी जगातील एक तृतीयांश पेक्षा जास्त हिमनद्या वितळतील. या संशोधनातून असे दिसून आले आहे की, प्रदूषणाचे प्रमाण असेच राहिल्यास समुद्राची पातळी आणखी वाढेल. सह-लेखक अधिकारी यांनी 'सीएनएन'ला सांगितले, "फक्त २०० वर्षांमध्ये आम्ही पृथ्वीच्या हवामान प्रणालीमध्ये इतका बदल केला आहे की, आम्ही पृथ्वीच्या फिरण्याच्या मार्गावर त्याचा प्रभाव पाहत आहोत." वितळणाऱ्या हिमनद्यांमुळे समुद्राच्या पातळीत वाढ होते, ज्यामुळे किनारपट्टीची धूप वाढते आणि मोठमोठी वादळे तयार होतात. त्यामुळे जगभरातील हवामान पद्धतींमध्येदेखील व्यत्यय निर्माण होतो आणि मत्स्यव्यवसायावरदेखील परिणाम होतो. आर्क्टिकमध्ये समुद्राचा बर्फ वितळल्याने वॉलरससारखे वन्यजीवांना त्यांचे निवासस्थान गमवावे लागते. ध्रुवीय अस्वल जमिनीवर अधिक वेळ घालवू लागले आहेत; ज्यामुळे लोक आणि अस्वल यांच्यातील संघर्षाचे प्रमाण वाढत चालले आहे.

### शास्त्रज्ञांनीच केले आश्चर्य व्यक्त

'वॉशिंग्टन पोस्ट'नुसार, काही शास्त्रज्ञांना या अभ्यासाने आश्चर्य वाटले नाही. टोरंटो विद्यापीठातील भौतिकशास्त्रज्ञ रिचर्ड पेल्टियर यांनी एक दशकापूर्वीचा एक अभ्यास प्रकाशित केला होता; ज्यामध्ये असे म्हटले होते की, "ग्लोबल वॉर्मिंगमुळे पृथ्वीच्या परिभ्रमणात बदल झाले आहेत." आणखी एका अलीकडील अभ्यासातही हे दिसून आले आहे की हवामान बदलामुळे वेळेवर कसा परिणाम होतो. परंतु, नवीन संशोधन दर्शविते की, हवामानातील बदलाचा प्रभाव पूर्वीपेक्षा वाढला आहे. हवामानाची स्थिती आणखी बिघडल्यास आणि ग्लोबल वॉर्मिंग आणखी वाढल्यास ही स्थिती आणखी बिकट होऊ शकते. पृथ्वीचा वेग असाच मंद राहिल्यास दिवसाचा कालावधी आणखी वाढू शकतो. त्यामुळे पृथ्वीच्या परिभ्रमणाचे नियमही बदलू शकतात, अशी भीती वर्तविण्यात आली आहे. संशोधकांनी यावर प्रकाश टाकला की, या बदलामुळे माणसाच्या दैनंदिन जीवनावरही परिणाम होऊ शकतो.

### बदलत्या वेळेचा तंत्रज्ञानावर परिणाम

शास्त्रज्ञांच्या टीमने असेही नमूद केले की, या अतिरिक्त सेकंदांचा तंत्रज्ञानावर महत्त्वपूर्ण परिणाम होईल. 'जीपीएस'साठी अचूक टाइमकीपिंग अत्यावश्यक आहे. जीपीएसचा वापर स्मार्टफोन असणारा प्रत्येक व्यक्ती करतो. नेव्हिगेशन सिस्टमही यात महत्त्वाचे आह. याचा अंतराळ प्रवासावरही परिणाम होऊ शकतो, असे तज्ज्ञांनी सांगितले. ते म्हणाले की, स्पेसशिपशी संवाद साधण्याचा प्रयत्न करताना पृथ्वी गोलाकार फिरण्याचा अचूक वेग जाणून घेणे महत्त्वाचे आहे. यात थोड्या बदलानेही अडचणी निर्माण होऊ शकतात.

**तापमानवाढीमुळे सध्या अतिवृष्टी, ढगफुटीसारख्या घटना घडत आहेत. वातावरणातील बदलांमुळे येत्या काळात आणखी भीषण परिस्थिती निर्माण होणार असून, त्यासाठी आजच उपाययोजना सुरू केली पाहिजे...**



# वातावरण बदलांचा सांगावा

भारतीय महाद्वीपात सन २००० पासून ०.६८ डिग्री सेल्सियसने तापमानात वाढ झाली, तर २०२१ ते २०३० च्या दरम्यान तापमानवाढ ०.५ डिग्री सेल्सिअसने वाढेल, असे अनुमान आहे. या शतकाच्या अखेरपर्यंत तापमानवाढ दोन ते चार डिग्री सेल्सियस असेल, असा अंदाज आहे. तापमानवाढीचे भीषण परिणाम आपण याच वर्षात अनुभवले. हिमालयात बर्फ वितळण्याच्या प्रक्रियेला प्रचंड वेग येत आहे. त्यामुळे कमी काळात प्रचंड पाऊस, मोठा पूर तसेच उन्हाळ्यात बाष्पीभवनाच्या प्रक्रियेत वाढ, जंगलांतील वणवे, कार्बन डायऑक्साइडची अधिक निर्मिती यांसारखे भीषण परिणाम जाणवत आहेत.

यावर्षी भारतात काही भागांत तापमान ४८ डिग्रीपर्यंत पोहोचले. दुष्काळ, पूर, शेतीचे अपरिमित नुकसान, पिकांच्या उत्पादनात घट, शेती व त्यावर अवलंबून रोजगारांत होणारी घट, शेतीतील वाढता तोटा व त्यामुळे मोठे स्थलांतर, शहरात एकदम पडणाऱ्या पावसामुळे होणारी भीषण परिस्थिती महाराष्ट्रात सांगली, कोल्हापूर, सिन्नर व त्यानंतर आता बेंगळुरूत आपण अनुभवली आहे. कमी काळात जास्त पाऊस पडल्याने भीषण परिस्थिती उद्भवते आहे. शहरातील पाणी निचरा होण्याची यंत्रणा या पावसामुळे हतबल होते. मालमत्ता, जनावरांची, शेतीची प्रचंड हानी होते. संपूर्ण मानवताच जणू पुन्हा शून्यापासून सुरुवात करते.

भारताला तर पूर, दुष्काळ या परिस्थितीचा सामना अनेक पातळीवर करावा लागेल. पाकिस्तान, बांगलादेश, श्रीलंका, नेपाळ आदी सर्व प्रदेशांतून विस्थापितांचे लोंढे या नैसर्गिक आपत्तीमुळे येत्या ५० वर्षांत भारतात येण्याची शक्यता आहे. सर्वाधिक धोका बांगलादेशापासून आहे. हिमालयीन नद्यांचा महासमुद्र बांगलादेशाला अनेकदा विळखा घालतो. भविष्यात तापमानवाढीमुळे प्रचंड पाऊस, बर्फ वितळणे या समस्यांमुळे संपूर्ण बांगला देशात पुराचे संकट वारंवार येणार आहे. गेल्या शंभर वर्षांत समुद्राच्या पातळीत ०.३ सेंटीमीटरने वाढ होणे हेच मुळात चिंताजनक आहे. तापमानवाढीमुळे बर्फ वितळण्याच्या प्रक्रियेला अधिक वेग प्राप्त होईल. त्यामुळे समुद्रपातळीत वाढ होऊन अनेक गावे, नगरे, वसाहती पाण्याखाली जाऊ शकतात. सध्या आशिया खंडात अनेक देशांवरील पूरसंकट त्याचे सूतोवाच करीत आहे. दुष्काळ आणि पूर या दोन्ही समस्यांवर आजच उपाय सुरू केले पाहिजेत.

## या सूचनांकडे गांभीर्याने पाहण्याची गरज

- बेंगळुरूला पुराचा विळखा पडला होता. मुंबईत कमी काळात झालेल्या अतिवृष्टीचे परिणाम आपण बघितले. दिल्ली आणि परिसर तापमानवाढीमुळे हिवाळ्यात जवळ जवळ शून्य दृश्यमानता पातळीवर जातो. गेली कित्येक वर्षे पुण्यात अतिपावसामुळे वसाहतींमध्ये पाणी शिरणे, रस्ते जलमय होणे हे प्रकार वाढत आहेत. त्यामुळे दिल्ली, बेंगळुरू, पुणे-मुंबई या तिन्ही शहरांपासून शंभर किलोमीटरवर, नद्यांपासून लांब नवीन शहरे वसवणे आवश्यक झाले आहे.
- तापमानवाढीमुळे शेतीचे उत्पादन घटणार असेल तर १५० कोटी लोकसंख्येच्या देशाची अन्नधान्याची गरज भागवण्यासाठी पर्यायी शेती पद्धतीचा विचार आवश्यक आहे. मागील वर्षी तापमानवाढीमुळे भारतात सर्व भागात शेती उत्पादनात घट झाली. अनेक शहरांमध्ये तापमान ४८ अंशांवर पोहोचले होते. अनेक धरणांमधील पाण्याच्या बाष्पीभवनास वेग येऊन उन्हाळ्यात शेतीला मिळणारे पाणी कमी झाले. अनेक शहरांत पिण्याच्या पाण्याची समस्या निर्माण झाली.
- पूर व दुष्काळ नियंत्रणासाठी मोठ्या प्रमाणात विजेची गरज भासणार आहे. त्यामुळे न्यूक्लिअर पॉवर व सोलर एनर्जी या दोघांची उत्पादन क्षमता वेगाने वाढवावी लागेल. सौर उर्जेत दरवर्षी किमान २५ टक्क्यांनी वाढ झाल्यास सन २०७० पर्यंतचे शून्य कार्बन उत्सर्गाचे ध्येय आपण गाठू शकू.
- देशांतर्गत स्थलांतर व देशाबाहेर होणारे निर्वासन व त्यावरील उपाय हा चिंतेचा विषय आहे. जिथे शेतीचे उत्पादन कमी होईल, शेतीवर अवलंबून रोजगार कमी होईल, जलसंकट जाणवेल, तेथून मोठ्या प्रमाणावर स्थलांतर होईल आणि त्याचा ताण शहरांवर येईल. त्यामुळे शहरी नियोजन कोसळेल. या गोष्टींचा विचार करून प्रतिबंधात्मक योजना आजच तयार कराव्या लागतील.
- पूर नियंत्रणासाठी दीर्घकालीन नियोजन करावे लागणार आहे. त्यासाठी मोठा निधी उभारावा लागेल. गेल्या दोन वर्षांपासून ढगफुटीच्या घटना देशभरात होत आहेत, अतिशय कमी वेळेत खूप पाऊस पडणे नित्याचे झाले आहे. अशावेळी, प्रचंड पुराला सामोरे जावे लागते. या दृष्टीने उपाययोजना कराव्या लागतील.
- दुष्काळी परिस्थितीत पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेसाठी दीर्घकालीन नियोजन व उपाययोजना कराव्या लागतील.
- पूरस्थिती नियंत्रणासाठी अनेक नवीन शहरे वसवावी लागतील. नव्या औद्योगिक वसाहती दुष्काळी भागात, नद्यांपासून लांब, पठारी भागात उभाराव्या लागतील.
- तापमानवाढीमुळे मानवी आरोग्यावर, जनावरांच्या आरोग्यावर होणाऱ्या परिणामांबाबत संशोधन व उपाय करावे लागतील.
- तापमानवाढ नियंत्रणासाठी कार्बन उत्सर्जन कमी झाले पाहिजे. भारतात या दृष्टीने अधिक प्रयत्न झाले पाहिजेत. आपम सन २०७० पर्यंत कार्बन उत्सर्जन शून्यावर आणण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. परंतु, यासाठी ऑइल आणि कोळसा यांचा वापर शून्यावर आणावा लागेल. परिणामी, सौर उर्जेची उत्पादन क्षमता किमान शंभर पटींनी वाढवावी लागेल.
- ढगफुटीच्या समस्या व अतिशय कमी वेळेत प्रचंड पाऊस आता देशभरात अनेक ठिकाणी होत आहे. पुणे, कोल्हापूर, नाशिक जिल्ह्यात या पावसाळ्यात अनेक ठिकाणी ढगफुटीसदृश परिस्थिती निर्माण झाली. या समस्येवर हवामान खात्याने अधिक अभ्यास करून, याबाबत लोकांना वेळीच जागृत केले तर मालमत्तेची व जीवितहानी टाळता येईल.
- मानवी इतिहासात प्रत्येक संकटावर मानवाने उपाय शोधून काढला. तापमानवाढीच्या अस्मानी संकटावर संशोधन, दीर्घकालीन नियोजन व उपाययोजना याद्वारे नक्कीच मार्ग निघेल. मात्र, त्यासाठी आपल्याला आजची धोक्याची घंटा अवधानपूर्वक ऐकावी लागेल आणि त्यानुसार कृती करावी लागेल.



### तापमानवाढीची 'ग्लोबल वॉर्निंग'

एकविसाव्या शतकाच्या अखेरीस देशाच्या सरासरी तापमानात किमान ४.४ अंशांनी वाढ होणार असून, त्यामुळे उष्णतेच्या लाटांचे प्रमाण तीन ते चार पटीने वाढणार आहे. चक्रीवादळे अधिक तीव्र होणार असून, समुद्राची पातळी साधारणपणे ३०० मिलिमीटरने (३० सेंटीमीटर) वाढणार आहे. गेल्या दोन ते तीन शतकांच्या तुलनेत हवामानातील बदलांचा वेग वाढणार असल्याचे निरीक्षण केंद्र सरकारने प्रसिद्ध केलेल्या हवामान बदल मूल्यांकन अहवालातून वर्तविण्यात आले आहे. केंद्रीय पृथ्वी विज्ञान मंत्रालयाने विविध संशोधन संस्थांच्या सहभागातून असेसमेंट ऑफ क्लायमेट चेंज ओव्हर इंडियन रिजन हा अहवाल नुकताच प्रसिद्ध केला आहे. पुण्यातील भारतीय उष्णकटिबंधीय हवामानशास्त्र संशोधन संस्थेने (इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ट्रॉपिकल मीटिओरॉलॉजी : आयआयटीएम) या अहवालाचे संपादन केले आहे. जीवाश्म इंधन, वेगाने घटते वृक्षाच्छादन, जमिनींचे व्यावसायिकीकरण, औद्योगिकीकरण, प्रदूषण यामुळे पर्यावरणाचा समतोल ढासळतो आहे. हवेतील कर्ब उत्सर्जन, हरितगृह वायूंचे (ग्रीन हाउस गॅस) प्रमाण वाढल्याने वातावरणातील उष्णता आणि पृथ्वीचे तापमान वाढते आहे. परिणामी ऋतुचक्रातही लक्षणीय बदल नोंदविण्यात आले आहेत. गेल्या दीडशे वर्षांतील या सर्व बदलांचा आढावा आणि मूल्यांकन या अहवालात आहे. तीस वर्षांत देशातील सर्वाधिक उष्ण दिवसांचे आणि उष्ण रात्रींचे तापमान अनुक्रमे ०.६३ अंश सेल्सिअस आणि ०.४ अंश सेल्सिअसनी वाढले आहे. रात्रीचा सरासरी गारवा कमी झाला आहे. एकविसाव्या शतकाच्या अखेरपर्यंत तापमान ४.७ ते ५.५ अंश सेल्सिअसनी वाढणार असल्याचा निष्कर्ष अहवालात नमूद करण्यात आला आहे. अहवालामध्ये शंभर वर्षांतील दुष्काळाचाही आढावा घेण्यात आला आहे.

# तापमान वाढीमुळे जगासाठी कोणता इशारा?

**जागतिक तापमान वाढीला आळा घालण्यासाठी जगभरातून प्रयत्न होत असले तरीही ते अपुरे असल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. त्यामुळे संपूर्ण जगासमोरच नवे आव्हान निर्माण झाले आहे. प्रामुख्याने या तापमान वाढीमुळे समुद्राची पातळी वाढत आहे आणि त्यामुळे लोकांना त्यांची जमीन आणि ओळख गमावण्याची भीती व्यक्त केली जात आहे. मालदीव, तुवालू, मार्शल आयलँड्स, नाउरू आणि किरिबाती या पाच देशांसाठी ही भीती सर्वाधिक आहे. यातील मालदीव हिंद महासागरातील असून, उर्वरित चार देश प्रशांत महासागरात आहेत. भीती प्रत्यक्षात उतरण्यापूर्वी जगभरातून कोणती पावले उचलली जातात, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.**

### समुद्राच्या पातळीत कधीपासून वाढ?

हवामान तज्ज्ञांच्या मते १९०० सालापासून समुद्राची पातळी १५ ते २५ सेंटीमीटर म्हणजेच सहा ते दहा इंचांनी वाढली आहे. या वाढीचा वेगही अधिक आहे. काही उष्णकटिबंधीय भागात तो दिसून येतो. समुद्राची पातळी वाढण्यासाठी तापमानात होणारी वाढ सर्वाधिक कारणीभूत आहे. ती अशीच सुरू राहिल्यास शतकाच्या अखेरीस प्रशांत आणि हिंद महासागरांतील चिमुकल्या बेटराष्ट्रांभोवती समुद्राची पातळी सुमारे ३९ इंचांनी वाढू शकते.

### किनारी भागात समुद्राची वाढ झाल्यास कशावर परिणाम होईल?

समुद्रकिनारी सूर्यस्नान करण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांना आता त्यासाठी जागा राहणार नाही. समुद्री कासव साधारणपणे किनाऱ्यावर वाळूत अंडी घालतात. मात्र, समुद्राची पातळी वाढल्याने त्यांना अंडी घालण्यासाठी जागा राहणार नाही. किनारपट्टीची हानी तर होईलच, पण कृषी उपक्रम, सार्वजनिक सेवा आदींवर देखील त्याचा परिणाम होईल. याशिवाय पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, रस्ते आणि मानवी वस्ती यावरही परिणाम घडून येईल.

### समुद्राच्या पातळीत वाढ झाल्यास मानवी नुकसान किती?

वाढत्या तापमानामुळे बर्फ वितळण्याचा वेग वाढत असून २०५० पर्यंत समुद्राची पातळी एक मीटरने वाढण्याची शक्यता आहे. यामुळे समुद्राच्या किनाऱ्यावरील ५७० पेक्षा जास्त विविध शहरांवर तसेच गावांवर त्याचा प्रभाव पडणार आहे. जगातील एकूण ८० कोटी लोकांना याचा थेट फटका बसण्याची भीती व्यक्त होत आहे.

### समुद्राची पातळी वाढण्यामागील कारण काय?

मानवी कृतींमुळे हरितगृह वायूच्या उत्सर्जनात वाढ होत आहे. परिणामी जागतिक सरासरी तापमानात वाढ होत आहे. याशिवाय भूकवचातील उभ्या स्थानिक हालचाली, भूभागावरील बर्फाच्या स्वरूपातील साठा, ध्रुवीय प्रदेशातील बर्फाचे वितळणे, पर्जन्यवृष्टी, महासागरांचे औष्णिक प्रसरण, समुद्रातील पाण्याचे तापमान व क्षारता, हवेचा भार, हवामानातील बदल, ऋतुमानातील बदल, सागरी प्रवाहांचे वितरण, सागरी लाटा, गुरुत्त्वाकर्षण, भरती-ओहोटी, वारा, वादळ, नद्यांद्वारे सागराला होणारा पाण्याचा पुरवठा इत्यादी कारणांमुळे समुद्रपातळीत व पर्यायाने समुद्रसपाटीच्या पातळीत वाढ होत आहे.

### समुद्राच्या पातळीत वाढ झाल्यास धोके कोणते?

समुद्राची पातळी वाढल्यास वादळांमध्ये वाढ होईल. भरती आणि ओहोटीमध्येदेखील वाढ होईल. त्यामुळे पाणी आणि जमिनीवर क्षार दूषित झाल्यामुळे अनेक प्रवाळ (लहान आकाराच्या प्राण्यांच्या वसाहती) समुद्रात स्थापित होण्यापूर्वीच त्यातील जीवसृष्टी नष्ट होतील. बेटे अदृश्य होऊन मूळ लोकांना इतर भागात विस्थापित व्हावे लागेल. जलाशयांमधील पाणी प्रदूषित होऊन ओलसर जमिनीवर पूर येतो. त्यामुळे या पारिस्थितिकीमध्ये राहणाऱ्या वनस्पती आणि प्राण्यांच्या जीवनावर परिणाम होईल.

## शॉर्ट न्यूज

### नेवाशात ठाकरे यांचा गंभीर आरोप

**नेवासा :** भाजप आणि मोदी, शहा यांना सहकारी साखर कारखाने बंद पाडून ते अदानी-अंबानीच्या घशात घालायचे आहेत. भाजपचे नेते जातात तिकडे खातात. त्यांनी अनेक उद्योग गुजरातला पळविल्याने महाराष्ट्रात बेरोजगारी वाढली असल्याचा गंभीर आरोप उध्दव ठाकरे यांनी केला. नेवासा येथे उध्दव ठाकरे यांनी महाविकास आघाडीसाठी सभा घेतली. नेवासे येथे महायुतीचे उमेदवार शंकरराव गडाख यांच्यासाठी आयोजित सभेत केंद्रीय सहकार खाते निर्माण करून केवळ महाराष्ट्रातील सहकार गिळंकृत करण्यासाठी अमित शहांनी ते स्वतःच्या बुडाखाली धरल्याचा आरोप केला.

### लाडकी बहीण योजना बंद होणार नाही

**कोपरगाव :** पश्चिमेचे पाणी पुर्वेकडे वळविण्याची योजना साकारण्याचे काम येड्यागबाळ्याचे नाही. त्यासाठी मोठा निधी लागतो. केंद्रात नरेंद्र मोदी यांचे सरकार आहे. पुढील साडेचार वर्षे तेच पंतप्रधान राहणार आहेत. त्यांच्या विचारांचे सरकार महाराष्ट्रात आल्यास निधी मिळू शकतो. त्याचा फायदा आपण करून घेतला पाहिजे, असे आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले. कोपरगाव विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार आ. आशुतोष काळे यांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत ते बोलत होते. सभेच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार अशोकराव काळे होते.

### शिवाजी कर्डिलेंचा तनपुरेंना टोला

**राहुरी :** मी १९९५ ला पहिल्यांदा आमदार झालो तेव्हापासून जनता दरबार घेवून सर्वसामान्य जनतेला न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करीत आहे. समोरचा व्यक्ती कोण आहे हे न पाहता मी त्याचे काम करण्याचा प्रामाणिक प्रयत्न असतो. सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातील असल्याने मला लबाडी करता येत नाही. म्हणूनच मला जनतेने पाच वेळा विधानसभेत पाठवले. जे लबाडी करून, गोडगोड बोलताना त्यांना जनता लवकरच कंटाळते. राहुरी विधानसभा मतदारसंघाच्या आताच्या लोकप्रतिनिधीने अशीच लबाडी केली व आज जनताच त्यांना पाडण्यासाठी आतूर झाली आहे.

### केलवड येथील सभेत विरोधकांवर निशाणा

**केलवड :** आम्ही जे बोलतो तेच करतो. निळवंडे पाण्याच्या बाबतीतसुद्धा पाणी आणण्याचा दिलेला शब्द मी पूर्ण करून दाखविला. या प्रश्नावरून केवळ आमची बदनामी केली गेली. असे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी म्हटले आहे. केलवड येथे महायुतीच्या प्रचारार्थ आयोजित सभेत त्यांनी महाविकास आघाडीवर टीका केली. महाविकास आघाडी सरकारने या राज्याला किंवा जिल्ह्याला काय दिले? भविष्यात काय करणार? हे सांगायला पाहिजे होते. परंतु केवळ व्यक्तिद्धेषातून जनतेचा बुद्धिभेद करायचा हाच त्यांचा प्रयत्न होता.

### आ.थोरातांना संधी म्हणजे संगमनेरला संधी

**संगमनेर :** आमदार बाळासाहेब थोरात यांनी हा तालुका आपला परिवार मानला, एकही दिवस विश्रांती न घेता काम केले. तालुक्याचा प्रगतीचा आलेख अधिक उंचीवर नेण्यासाठी आणि खऱ्या अर्थाने प्रगतीला जास्त वेग देण्यासाठी त्यांना राज्याच्या सर्वोच्च नेतृत्वापर्यंत पोहोचवा, त्यांना राज्याच्या नेतृत्वाची संधी म्हणजे संगमनेरकरांना संधी असल्याचे प्रतिपादन विधान परिषद सदस्य आमदार सत्यजीत तांबे यांनी केले.

# घोडगंगा सुरु करुन दाखवणारच : पवार

## शरद पवारांच्या सभेला अभूतपूर्व गर्दी

**शिरुर : प्रतिनिधी**

**शिरूरच्या शेतकऱ्यांनो " घोडगंगा सहकारी साखर कारखाना मी सुरू करुन दाखवणारच " हा माझा तुम्हाला शब्द आहे, मी शब्दाचा पक्का आहे.त्याबद्दल कसलीही शंका मनात ठेवू नका.असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी केले.**



वडगाव रासाई (ता.शिरूर)येथे राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अधिकृत उमेदवार अशोक पवार यांच्या प्रचारासाठी आयोजित सभेत ते बोलत होते.यावेळी शिरूरसह हवेलीतील नागरिकांनी सभेला मोठया प्रमाणात अभूतपूर्व गर्दी केली होती.त्यामुळे वडगाव- मांडवगण फराटा रस्त्यावर दोन्ही बाजुला पाच किलोमीटरपर्यत वाहनांच्या रांगा लागल्या होत्या.

पवार म्हणाले की,वाढते नागरीकरण व काही इतर घटनांमुळे यशवंत साखर कारखाना बंद पडला. परंतु शिरूरचा घोडगंगा चांगला चालू होता.गळीत हंगाम सुरू करण्यासाठी एनसीडीसी कडून मंजूर झालेले कर्ज या शिंदे सरकारने अडवले.याबाबत मी मुख्यमंत्री शिंदे यांना भेटून विचारणा केली मात्र माझी अडचण आहे समजून घ्या असे ते म्हणाले.म्हणजे यांना कोण दम देते हे आता माझ्या लक्षात आले आहे. सत्ता ही अडवणूक करण्यासाठी नसते.परंतु घोडगंगा करखान्या संदर्भात केंद्राच्या एनसीडिसी कडून कर्ज मंजूर होऊनही राजकीय हेतु डोळ्यासमोर ठेऊन राज्य शासनाने घोडगंगाची कर्जाबाबत अडवणूक केली.हल्ली महाराष्ट्रात पैसे असतानाही काही कारखाण्यांना पैसे दिले जात नाहीत ही दुर्दैवी बाब आहे.सरकार आल्यानंतर शिरूरकरांच्या हक्काचा घोडगंगा कारखाना सुरू केला जाईल अशी ग्वाही राष्ट्रवादीचे पक्ष प्रमुख शरद पवार यांनी येथे दिली.

यावेळी पवार यांनी यापूर्वी केलेल्या कर्ज माफीची माहिती देत महाविकास आघाडीची पंचसूत्री जाहिरनाम्याचे विश्लेषण केले.चासकमान व घोड धरणाचे पाणी शिरूर तालुक्यात आणल्याने सध्या शिरूर तालुका हा ८५ टक्के बागायती झाला आहे.एमआयडीसी उभी केल्याने डोंगराळ असलेल्या रांजणगाव परिसरात विविध कंपन्या सुरू झाल्या. पर्यायाने शेतकऱ्यांना दोन अधिकचे पैसे मिळाले तर युवकांना रोजगार मिळाला आहे.सुजाता व अशोक पवार ही वाहून घेणारी माणसं आहेत.त्यांच्यावर अनेक संकटे आलेली असतानाही ते माझ्या सोबत ठामपणे उभे राहिले.त्यामुळे त्यांच्या पाठीशी तुम्ही खंबीरपणे उभे रहा.मोठ्या मताधिक्याने अशोक पवार यांना विधानसभेत पाठवा असे आवाहन पवार यांनी केले.


उत्तम जानकर म्हणाले,पुढील उमेदवार हा बाळूमामाची यात्रा घडून मते मागत आहेत.बाळूमामा हे आमच्या हृदयात आहेत.मात्र यात्रा घडून पाच वर्षासाठी विकाऊ आमची जात नाही.राज्यात सत्तेसाठी अनेक पक्ष फोडले गेले.परंतु अशोक पवार यांनी गद्दारी न करता संघर्षाचा मार्ग निवडला.राज्यात जाती पातीत भांडणे लावून विष पेरण्याचे काम हे सरकार करत आहे.आगामी मंत्री मंडळात अशोक पवार मंत्री असणार आहेत.यामुळे भुलथापांना बळी न पडता त्यांना निवडून द्या, असे आवाहन त्यांनी केले.

अशोक पवार म्हणाले, आमच्या कुटुंबावर अनेक संकटे आली मात्र आम्ही न डगमगता त्या संकटाना सामोरे जात पवार साहेबांसोबत आहोत. गद्दारीचा शिक्का हा मेल्याशिवाय पुसत नाही.त्यामुळे आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत आम्ही पवार साहेबांसोबतच राहणार आहे.आपल्यावर संकटे येतात तेव्हा पवार साहेबच धाऊन येतात.अडीच वर्षात मोठ्या प्रमाणात निधीची अडवणूक केल्याने विकास कामे रखडली. विरोधी उमेदवाराकडील सर्व लोक हे एमआयडीसी माफिया,सँड व लँड माफिया आहेत.तुम्ही त्यांना निवडुन देणार आहात का.सरकार आल्यानंतर शिरूर हवेलीतील दोन्ही साखर कारखाने सुरू करावेत तसेच शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळावी अशी मागणी त्यांनी केली.यावेळी राष्ट्रवादी शरद पवार पक्षासह महाविकास आघाडीमधील घटक पक्षांचे पदाधिकारी उपस्थित होते.

> **गद्दारांना गाडा**
>
> **तरूणांना हक्काच्या रोजगार उपलब्ध व्हावा म्हणून मी औद्योगिक वसाहत शिरुर मध्ये आणली. या औद्योगिक वसाहतीमध्ये पक्षाच्या जोरावर अनेकांनी आपले बस्तान बसवले. पदे मिळवली. आणि हीच मलिदा गँग राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा उमेदवार पाडायला एक झाली आहे. अशा गद्दारांना शिरुर करांनी गाडून टाका, असे आवाहन ही शरद पवार यांनी केले.**

# शहरातील शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे काम उत्कृष्ट

## माजी आमदार अरुण जगताप यांचे प्रतिपादन



**नगर : प्रतिनिधी**

**राज्यात महायुतीचे सरकार आल्यावर राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांनी नगर शहराच्या विकासासाठी आमदार संग्राम जगताप यांनी सुचवलेल्या सर्व विकासकामांना मंजुरी देत खूप मोठा निधी दिला आहे. आमदार संग्राम जगताप यांनी शहर विकासाचा ध्यास घेत शहराला मेट्रो सिटीचा दर्जा मिळवून देण्याचा निश्चय केला आहे. या निवडणुकीत महायुतीमधील सर्व घटक पक्षाचे खूप सहकार्य होत आहे. नगर शहरातील गोरगरीब कुटुंबीयांना वैद्यकीय मदत मिळवून देण्यासाठी शहरातील शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे खूप उत्कृष्ट काम चालू आहे. या मदत कार्यातून गोरगरिबांचे आशीर्वाद मिळत आहेत. हे काम असेच अखंडितपणे चालू ठेवा, असे प्रतिपादन माजी आमदार अरुण जगताप यांनी केले.**

शिवसेना वैद्यकीय मदत कक्षातर्फे महायुतीचे उमेदवार आमदार संग्राम जगताप यांच्या प्रचारार्थ आयोजित मेळाव्यात अरुण जगताप यांनी मार्गदर्शन केले. यावेळी शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या वतीने जिल्हाप्रमुख अनिल शिंदे यांनी अरुण जगताप यांचा सत्कार करून स्वागत केले. यावेळी जिल्हाप्रमुख बाबूशेठ टायरवाले, शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे जिल्हा संपर्कप्रमुख रणजितसिंह परदेशी, जिल्हा समन्वयक संदीप सप्रे, जिल्हाप्रमुख मंगेश शिंदे, उपजिल्हाप्रमुख काका शेळके, ओंकार शिंदे, अंबादास कराळे, शहर प्रमुख रोहित लोखंडे, विपुल शेटिया, डॉ.विजय भंडारी आदी उपस्थित होते.

जिल्हाप्रमुख अनिल शिंदे म्हणाले, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सहकार्याने नगर शहरात शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे काम चांगल्या प्रकारे चालू आहे. सर्व पदाधिकारी नागरिकांच्या मदतीसाठी कायम तत्पर असतात. याबद्दल वैद्यकीय पक्षाचे कौतुक, विधानसभा निवडणुकीसाठी आता थोडे दिवस बाकी आहेत. त्यामुळे महायुतीचे उमेदवार आमदार संग्राम जगताप यांना जास्तीत जास्त मतांनी निवडून आणण्यासाठी सर्वांनी प्रचार करून आमदार जगतापांना जास्तीत जास्त मतदान घडवून आणा, असे त्यांनी सांगितले.

प्रास्तविकात जिल्हा संपर्कप्रमुख रणजीतसिंह परदेशी यांनी वैद्यकीय कक्षाची माहिती देताना पक्षाचे काम कशाप्रकारे चालते व नगर शहर व सर्व तालुक्यातील सर्वसामान्य रुग्णांचे हॉस्पिटलची बिलं कक्षाच्या माध्यमातून कमी करून रुग्णांना धीर देण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे त्यांनी सांगितले.

# किल्ले बनवा स्पर्धेचा बक्षीस वितरण संपन्न

## विजेत्या विद्यार्थ्यांचा बक्षिस व सन्मानचिन्ह देऊन गौरव



**निघोज : प्रतिनिधी**

**आम्ही पठारवाडी युथ फाउंडेशन आयोजित दिपावली निमित्त गडकिल्ले बनवणे स्पर्धेत शाळेतील विद्यार्थ्यांनी अगदी उत्साहाने सहभाग घेऊन अतिशय सुंदर किल्ले बनविले.**

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पारनेर कृषि उत्पन्न बाजार समितीचे संचालक किसनराव सुपेकर व प्रमुख पाहुणे शिवव्याख्याते-प्रा.ज्ञानेश्वर कवाद सर यांच्या शिवव्याख्याणाने कार्यक्रमाची सुरवात झाली तसेच प्रसिद्ध जादूगर प्रकाश शिरोळे यांनी जादूचे प्रयोग करुन मुलांना आनंदित केले.

यावेळी उपस्थित श्री.मुलिका विद्यालयाचे मा.प्राचार्य एकनाथ पठारे सर,विद्यमान उपसरपंच भिकाजी पठारे,संचालक नामदेव पठारे,मा. प्राचार्य रामचंद्र सुपेकर ,पारनेर तालुका युवासेना उपाध्यक्ष/ग्रा. सदस्य मोहनराव पवार, ग्रा. सदस्य शंकरराव पठारे, मा. उपसरपंच शहाजीराजे बोदगे,चेअरमन गुलाबराव पठारे, व्हा.चेअरमन सिद्धेशर पठारे, ह. भ.प रमेश महाराज वाढवणे, शिवाज्ञा प्रतिष्ठान अध्यक्ष स्वप्निल पवार, वेदांत डेव्हलोपर्स मोहनशेठ सुपेकर, समर्थ डेव्हलोपर्स महावीर दादा पवार , मा.व्हा.चेअरमन बाळासाहेब पवार,सोसायटी संचालक अनिल सुपेकर,संचालक पांडुरंग सुपेकर,योगेश बोदगे,विकासराव गवळी,मा. चेअरमन भानुदास पठारे,मा.सरपंच सुरेखा पठारे, ग्रा.सदस्य सुरेखा पठारे,मुरलीधर सुपेकर साहेब,बालाजी डेअरी चेअरमन बबनराव पवार, कानिफनाथ डेअरी चेअरमन मुकुंद पठारे,मा. उपसरपंच इंद्रभान सुपेकर,भरत पवार साहेब, मेजर संजय सुपेकर,गणेश पवार, विश्वास सुपेकर, योगेश पवार,तुषार पवार, वैभव पवार, दत्ता पठारे,निलेश पठारे, किरण पवार, दिपक पठारे, नितिन धोंगडे,अरुण पवार, गणेश पठारे, सोमनाथ गोसावी.

यावेळी स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थीना बक्षिसे व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले या मध्ये छोट्या गटात प्रथम क्रमांक कु समिक्षा सुपेकर ,द्वितीय क्र वेदिका पवार,तृतीय क्र-स्वरित पठारे, चतुर्थ क्र.प्रज्वल पठारे,पाचवा क्र-स्वराज सुपेकर/ सोहम बोदगे,मोठा गट प्रथम क्रमांक कु. शिवम पठारे,द्वितीय क्र वैभव पवार,तृतीय क्र आयुष गणेश पठारे,चतुर्थ क्र आयुष बाजीराव पठारे, पाचवा क्र अर्णव सुपेकर/अथर्व सुपेकर यांचा समावेश होता. सहभागी सर्व विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र व उत्तेजनार्थ बक्षीसाचे वाटप करण्यात आले.

परीक्षणाचे काम पुणे जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार विजेते प्रा.संतोष पठारे सर व सिमा तांबे मॅडम यांनी पाहिले.सोसायटी संचालक किरण सुपेकर व युवा नेते कुंडलिक पठारे यांनी सूत्रसंचालन केले तसेच उपसरपंच दौलतराव सुपेकर यांनी सहभागी सर्व स्पर्धेकांचे आभार मानले व या पुढेही दरवर्षी आशाच मोठ्या पध्दतीने स्पर्धेच नियोजन केले जाईल असे किल्ले बनवा समितीच्या वतीने जाहीर करण्यात आले .या कार्यक्रमासाठी पठारवाडी ग्रामस्थ व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गुरुनानक यांच्या जयघोषाने दुमदुमला परिसर!

## जनक ,आहुजा परिवाराच्या वतीने स्वागत

**नगर : प्रतिनिधी**

**जो बोले, सो निहाल, सत श्री अकाल चा जयघोष, अखंडपाठ, किर्तन व प्रवचनांच्या भक्तीमय वातावरणात शहरातील विविध गुरुद्वारा येथे गुरुनानक देवजी यांची ५५५ वी जयंती म्हणजेच गुरुपुरब उत्साहात साजरा करण्यात आला. शुक्रवार (ता. १५) सकाळी तारकपूर येथील भाई कुंदनलालजी गुरुद्वारा येथून शीख, पंजाबी व सिंधी समाजाच्या वतीने पारंपारिक वाद्य सह प्रभातफेरी काढण्यात आली होती. यामध्ये समाजबांधव व महिलांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन गुरुनानक देवजी यांचा जयघोष केला.**




तारकपूर परिसरातून निघालेल्या या प्रभातफेरीचे टॉपअप पेट्रोल पंम्प येथे जनक आहुजा परिवाराच्या वतीने स्वागत करण्यात आले. फेरीमध्ये वाहनावर असलेल्या गुरुग्रंथ साहिबावर फुलांचा वर्षाव करण्यात आला. तर गुरुनानक देवजी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थित भाविकांनी सामुदायिक अरदास (प्रार्थना) करुन सुख, समृध्दी व शांततेसाठी प्रार्थना केली.

याप्रसंगी जनक आहुजा, हरजितसिंह वधवा, रवी बक्षी, राजीव बिंद्रा, जतीन आहुजा, अभिमन्यू नय्यर, अनिश आहुजा, राजेंद्र कंत्रोड, बबलू आहुजा, ब्रिजमोहन कंत्रोड, निप्पू धुप्प्ड, सौरभ आहुजा, सतीश गंभीर, किशोर कंत्रोड, सागर कुमार, गुलशन कंत्रोड, कैलाश नवलानी, जय रंगलानी, भारत पेट्रोलियमचे टेरीटोरी कॉर्डिनेटर किर्ती कुमार, विकी कंत्रोड, दिनेश कंत्रोड, पियुष कंत्रोड, गौरव कंत्रोड, दामोदर माखीजा, अवतार गुरली, मनमोहन चोपडा, रोहित बत्रा आदींसह समाजबांधव व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

गुरुनानक जयंतीनिमित्त मागील सात दिवसापासून शहरातील व तारकपूर येथील गुरुद्वारा येथे विविध धार्मिक कार्यक्रमाचे व सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कीर्तन-प्रवचन, अखंडपाठ, सांस्कृतिक कार्यक्रमासह लंगरचा भाविकांनी लाभ घेतला. कीर्तन प्रवचनाच्या माध्यमातून गुरूनानक देवजी यांचे संदेश व विचार समाज बांधवांना सांगण्यात आले.

# काशिनाथ दातेंसह परिवारावर गुन्हा दाखल करा

## बेपत्ता दिपक उंडे प्रकरणी पोलीस अधीक्षकांकडे मागणी | ज्ञानेश्वर उंडे यांची तक्रार

**पारनेर : प्रतिनिधी**

**दि. ४ डिसेंबर २०२२ रोजी दिपक सुदाम उंडे याचे अपहरण करून त्याचा घातपात केल्याप्रकरणी काशिनाथ दाते यांच्यासह त्यांच्या परिवारातील सदस्यांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी दिपक उंडे यांचे भाऊ ज्ञानेश्वर उंडे यांनी पोलीस अधिक्षकांकडे केलेल्या तक्रारीत केली आहे.या प्रकरणी उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार क्राईम ब्रँचकडे गुन्हा वर्ग करण्यात आला असून त्या आधारे या आरोपींना अटक करावे असे ज्ञानेश्वर उंडे यांचे म्हणणे आहे.**

पोलीस अधिक्षकांकडे देण्यात आलेल्या तक्रारीत नमुद करण्यात आले आहे की, दि.४ डिसेंबर रोजी डॉ. प्रदिप दाते यांचा फोन आल्यानंतर दिपक वाढदिवसाला जाण्यासाठी घराबाहेर पडला. त्यानंतर तो परत आलाच नाही. तो घरी न परतल्याने त्याच्या फोनवर संपर्क करण्यात आला असता फोन बंद होता. दिपक बाहेर पडण्यापूव डॉ. प्रदीप दाते यांचा फोन आला असल्याने डॉ.दाते यांच्याशी संपर्क केला असता त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली तसेच खोटी माहीती देऊन दिशाभुल केल्याचे या तक्रार अर्जात नमुद करण्यात आले आहे.

डॉ. दिलीप दाते यांना दिपक बेपत्ता झाल्याबाबत पोलीसांकडे तक्रार करू का अशी विचारणा केली असता तक्रार करू नका, दिपक यास वैभव गुंजाळ याने निवडुंगेवाडी रस्त्यावर पाहिले असल्याचे सांगितले. वैभव व दिपक यांच्यात फोनवर झालेल्या संभाषणाचे रेकॉर्डींगही डॉ. दाते यांनी आपणास ऐकविल्याचे ज्ञानेश्वर उंडे यांनी तक्रारीत नमुद केले आहे.

डॉ.प्रदीप दाते यांच्या पत्नी दिपाली दाते यांनीही दिपक यास टाकळी ढोकेश्वर येथे हॉस्पिटलसमोरून जाताना पाहिल्याचे डॉ. प्रदीप यांनी सांगितले होते. अनेक वेळा डॉ. प्रदिप दाते यांनी दिपकबाबत दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला होता. दिपक हा शिवसेनेच्या युवा सेनेचा संघटक होता. काशिनाथ दाते हे शिवसेना पक्षाचे जिल्हा परिषद सदस्य होते. त्यामुळे काशिनाथ दाते यांच्यावर आमचा पुर्ण विश्वास होता, त्यांच्यावर आम्ही अंध विश्वास ठेवला असेही या तक्रारी म्हटले आहे.



**दिपक उंडे खुन प्रकरणी काशिनाथ दाते व त्यांच्या परिवारातील सदस्यांवर गुन्हा दाखल करावा अशी मागणी ज्ञानेश्वर उंडे यांनी तक्रार अर्जाद्वारे पोलीस अधिक्षकांकडे केली.**

### दाते कुटूंबियांसमवेत दिपकच्या पत्नीचाही सहभाग

**दिपक बेपत्ता झाल्यानंतर सहा महिन्यात काशिनाथ दाते यांनी त्यांच्या जवळच्या नातेवाईकासोबत दिपकची पत्नी जयश्री हीचे लग्न लाऊन दिले. ती दोन जुळया मुलींसह दुसऱ्या पतीसोबत नांदत आहे. लग्नापूर्वी नातेवाईकांमार्फत काशिनाथ दाते यांच्याशी नातेवाईकांकडून संपर्क करून जयश्री हिचे दुसरे लग्न करू नका असा निरोप दिला असता दाते यांनी तुम्ही केस पुर्णपणे मिटवून घ्या, नाहीतर मी माझ्या नातेवाईकांसोबत तिचे लग्न लाऊन देईल असे सांगितले होते. या गुन्हयाबाबत जयश्री हिचाही दाते कुटूंबियांसमवेत मोठा सहभाग असल्याचे अम्हाला समजले असल्याचेही ज्ञानेश्वर यांचे म्हणणे आहे.**

दिपक बेपत्ता झाल्यापासून आम्ही अनेकदा काशिनाथ दाते यांच्याकडे गेलो. त्यावेळी त्यांनी कोणतेही सहकार्य केले नाही. दिपक याची बहिण ज्योती हारदे ही चौकशीसाठी पोलीस ठाण्यात गेली असता काशिनाथ दाते यांनी घरी येऊन या पोरीचे पोलीस ठाण्यात काय काम आहे ? कोणीही पोलीस ठाण्यात जायचे नाही.गेल्यास गाठ माझ्याशी आहे. मी दिसतो तसा भोळा चेहरा नाही, माझा खरा चेहरा तुम्हाला माहीती नाही. प्रेमात सांगतो नाहीतर मला माझया पध्दतीने तुमचा बंदोबस्त करावा लागेल अशी धमकीही काशिनाथ दाते यांनी दिल्याचे तक्रारीत म्हटले आहे. त्यांच्या नातेवाईकांमार्फत आजही धमक्या देण्यात येत असल्याचे ज्ञानेश्वर उंडे यांचे म्हणणे आहे.

### राजकीय दबावातून अटक होऊ दिली नाही

**दिपक उंडे बेपत्ता झाल्याप्रकरणाची संपूर्ण माहीती तसेच पुरावे पोलीसांना देण्यात आल्यानंतर गुन्हा दाखल करून काही आरोपींना अटक करण्यात आली. या प्रकरणात डॉ. प्रदीप दाते हे देखील आरोपी होते. राजकीय दबावातून डॉ. प्रदीप दाते यास अटक करू दिली नाही. त्यानंतर प्रदीप दाते यांने अटकपूर्व जामीन मिळविला. पुरावे देण्यात येऊनही राजकीय दबाव असल्याने पोलीसांकडून आम्हला कोणतीही मदत मिळत नसल्याचीही ज्ञानेश्वर उंडे यांची तक्रार आहे.**

### आमच्या कुटूंबावर दबाव आणला जातोय

**आमच्या गरीब कुटूंबावर वेळोवेळी राजकीय दबाव आणण्यात येत असून आमच्या नावाची बदनामी करण्यात येत आहे. माझा भाऊ दिपक याच्या खुनाशी डॉ. प्रदीप दाते,त्याची पत्नी दिपाली दाते यांचा सहभाग असून हे कटकारस्थानासाठी मदत करणारे काशिनाथ दाते यांना या गुन्हयात आरोपी करून आम्हाला न्याय द्यावा, या गुन्हयाचा तपास उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार क्राईम ब्रँचकडे वर्ग करण्यात आला असून या आरोपींना तात्काळ अटक करण्याची मागणी ज्ञानेश्वर उंडे यांनी केली आहे.**

# उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या भाळवणीच्या सभेकडे मतदारसंघाचे लक्ष

## काशिनाथ दाते यांच्या प्रचारार्थ रविवारी सभेचे आयोजन

**भाळवणी : प्रतिनिधी**

**महायुतीचे उमेदवार काशिनाथ दाते यांच्या प्रचारासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची उद्या (रविवारी) तालुक्यातील भाळवणी येथे प्रचारसभा होणार असून या सभेकडे संपूर्ण मतदारसंघाचे लक्ष लागले आहे.**



अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघात उद्या सकाळी ९:३० वाजता बाजारतळ, भाळवणी ता.पारनेर येथे आयोजन करण्यात आलेल्या प्रचार सभेसाठी महाराष्ट्र राज्याचे महसूल तथा अहिल्यानगरचे पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील, माजी मंत्री तथा जिल्हा बँकेचे चेअरमन शिवाजीराव कर्डिले, माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांसह तालुक्यातील महायुतीचे सर्व आजी-माजी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत.

मोठ्या प्रमाणातील राजकीय घडामोडीनंतर उमेदवारी निश्चित झालेल्या दाते यांना पक्षातील व सर्व समविचारी पक्षातील सहकाऱ्यांनी सहकार्य केल्याने वेळ कमी असूनही त्यांनी प्रचारात चांगल्या प्रकारे आघाडी घेतल्याचे दिसून येत आहे. या निवडणुकीच्या निमित्ताने एकूण १२ उमेदवार जरी रिंगणात असले तरी सुरवातीच्या काळात खरी लढत ही महाविकास आघाडी व महायुती म्हणजेच लंके व दाते अशीच होईल असे वाटत होते परंतु माजी आमदार विजयराव औटी, जि.प.सदस्य संदेश कार्ले व नगराध्यक्ष विजय औटी यांच्या अपक्ष उमेदवारीमुळे या मतदार संघातील निकालाची नेमकी काय परिस्थिती राहील हे सांगणे अवघड झालेले असतानाच लंकेनी राजकीय विरोध पुकारलेले अजित पवार, राधाकृष्ण विखे पाटील, शिवाजी कर्डिले व डॉ.सुजय विखे पाटील यांच्यासारखे दिग्गज या मतदारसंघात येणार असल्याने या होणाऱ्या सभेकडे संपूर्ण मतदार संघाचे लक्ष लागले आहे.

# ध्यान व योगसाधनेच्या माध्यमातून महिलांमध्ये प्रचार!

## शीतल जगताप यांचा अनोखा फंडा | संग्रामभैय्यांना विजयी करण्याचे आवाहन

**नगर : प्रतिनिधी**

**विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराच्या धावपळीतून माजी नगरसेविका शीतल जगताप यांनी काही काळ उसंत घेत जिजाऊ ग्रुपच्या महिलांबरोबर ध्यान व काही योगासने केली. तसेच महायुतीचे उमेदवार आ.संग्राम जगताप यांना मतदान करण्याचे आवाहन केले.**



विधानसभा निवडणुकीच्या रणभूमीत पूर्ण जगताप कुटुंबीय उतरले आहे. आ.जगताप यांच्या पत्नी शीतल जगताप शहरातील विविध भागांमध्ये महिलांच्या भेटी घेऊन प्रचार करत आहेत. आनंदऋषीजी हॉस्पिटल जवळील विविध वसाहतींमध्ये प्रचारा दरम्यान त्यांनी महावीर इंटरनॅशनलच्या हॉलमध्ये सुरु असलेल्या जिजाऊ ग्रुपच्या योगा सेंटरला भेट दिली. तेथे योगसाधना करणाऱ्या महिलांशी संवाद साधत थोडावेळ थांबून ध्यान व काही योगासने केली. यावेळी योग प्रशिक्षक मनीषा गुगळे यांनी शीतल जगताप, पूजा गोंडाळ व माजी नगरसेवक संजय चोपडा यांचे स्वागत करून सत्कार केला.

यावेळी शीतल जगताप म्हणल्या, आ.संग्राम जगताप हे सर्वांसाठी कायम उपलब्ध राहून सर्वांची काळजी घेणारे आमदार आहेत. कोरोना काळात त्यांनी केलेले मदत कार्य सर्वश्रुत आहे. शहर विकासाचा ध्यास घेत सर्वांना अपेक्षित असलेला विकास त्यांनी साधला आहे. आता शहराला मेट्रोसिटी करण्याचा चंग बांधला त्यांनी आहे. त्यांना आपल्या सर्वांची खंबीर साथीची गरज आहे. यासाठी या निवडणुकीत शहराच्या विकासासाठीच मतदान करून संग्राम जगताप यांना पुन्हा संधी द्यावी, असे आवाहन केले.यावेळी माजी नगरसेविका मीना चोपडा यांनी सर्वांचे आभार मानले.

# आ.जगताप यांच्या प्रचारार्थ भाजपच्या प्रचार फेऱ्या

## विकासकामांच्या मुद्यावर मतदारांचा प्रतिसाद

**नगर : प्रतिनिधी**

**महायुतीचे उमेदवार आ.संग्राम जगताप यांच्या प्रचारार्थ भाजपच्या वतीने शहर जिल्हाध्यक्ष अभय आगरकर यांच्या नेतृत्वाखाली नगर शहरात विविध भागांमध्ये प्रचार फेऱ्या काढण्यात येत आहेत. या प्रचार फेरीमध्ये भाजपचे पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी होत उमेदवार संग्राम जगताप यांना मतदान करण्याचे आवाहन नागरिकांना करीत आहेत.**



यावेळी अभय आगरकर म्हणाले नगर शहरामध्ये महायुतीला चांगले वातावरण असून उमेदवार आ.संग्राम जगताप यांना चांगला प्रतिसाद सर्व भागातून मतदार बंधू भगिनी देत आहेत. आमदार संग्राम जगताप यांनी केलेल्या विकास कामांच्या मुद्द्यावरच ही निवडणूक लढवण्यात येत आहे. राज्यातील महायुती सरकारने नगर शहराच्या विकासासाठी दिलेल्या कोट्यावधी रुपयांच्या निधीमुळे नगर शहरांमध्ये सर्व भागांमध्ये विकास कामे प्रगतीपथावर आहेत. भविष्यात राज्य सरकारकडून आणखीन भरीव निधी प्राप्त होण्यासाठी नगरमधून संग्राम जगताप यांचा विजय होणे आवश्यक आहे. यासाठी नागरिकांनी विधानसभा निवडणुकीत जास्तीत जास्त मतदान करून महायुतीचे उमेदवार आ. संग्राम जगताप यांना बहुमताने विजयी करावे, असे आवाहन केले.

यावेळी ज्येष्ठ नेते सुनिल रामदासी , मालन ढोणे , प्रशांत मुथा , संजय ढोणे, अजय ढोणे, दत्ता गाडळकर , पंडित वाघमारे , कालंदी केसकर , अभिजीत ढोणे, प्रवीण ढोणे ,सुरेखा विद्ये, राजू मंगलारप , प्रिया जानवे , श्री.फुलारी , सविता कोटा , ज्योती दांडगे , शुभम जाधव , राहुल मुथा, बंटी ढापसे , ज्ञानेश्वर काळे , राजू विधे , वैभव लांडगे , गोपाल वर्मा , राहुल रासकर , श्वेता पांधडे, मयूर बोचुघोळ , साहिल शेख , ज्ञानेश्वर भांगे , राजू वाडेकर , अमोल निस्ताने , मिलिंद गंधे , गोकुळ काळे , अर्चना बनकर , बाळासाहेब गायकवाड , ज्ञानेश्वर धिरडे , भार्गव फुलारे , रुद्रेश अंबाडे , विकी आव्हाड , कैलास शिंदे , केतन घोधडे , प्रताप परदेशी , प्रशांत आडेप , अजित कोतकर , तन्मय बारसे , महेश साबळे , युवराज ससाणे , सोनू बोरुडे , रोहीत परदेशी , दीपक उमाप , राखी आहेर आदी उपस्थित होते.

# परिवर्तनाच्या लढाईत साथ द्या

## काशिनाथ दाते यांचे आवाहन | अळकुटी परिसरात प्रचार दौरा

**अळकुटी : प्रतिनिधी**

**यापूर्वीच्या नेतृत्वाने कधी गावाच्या राजकारणात भाग घेतला नाही. गट-तट पाडले नाहीत. विरोधकाला त्रास देण्याची भूमिका घेतली नाही हा त्रास थांबविण्यासाठी या निवडणूकीत परिवर्तन करण्याची आवश्यकता असून परिवर्तनाच्या या लढाईत साथ देण्याचे आवाहन महायुतीचे उमेदवार काशिनाथ दाते यांनी केले.**



अळकुटी परिसरातील अळकुटी, म्हस्केवाडी, शिरापुर, राळेगण थेरपाळ, वडनेर बुद्रुक परिसरात महायुतीचे उमेदवार काशिनाथ दाते यांच्या गाव भेट प्रचार दौऱ्यामध्ये काशिनाथ दाते हे बोलत होते. यावेळी मधुकर उचाळे, अशोक सावंत, प्रशांत गायकवाड, सचिन वराळ, वसंत चेडे, भास्कर उचाळे, दिनेश बाबर, लहू भालेकर, अशोक चेडे, संग्राम पावडे, शहाजी कवडे, रखमाजी कापसे यांच्यासह स्थानिक नागरीक यावेळी उपस्थित होते.

यावेळी बोलताना दाते म्हणाले, यापूर्वी तालुक्यात विकासाच्या मुद्यावर राजकारण होत होते. गेल्या पाच वर्षांपासून हा मुदद्दा मागे पडून प्रसिध्दीवर निवडणूक आली. त्यास आपण भुललो व निवडणूकीचा निकाल वेगळा लागला. लोकसभेच्या निवडणूकीत विखे पाटलांवर घराणेशाहीचा आरोप करण्यात येत होता. आता यांनीच घराणेशाही सुरू केली आहे. त्यासाठीच ही परिवर्तनाची लढाई सुरू केली आहे. मला विश्वास आहे की या परिवर्तनाच्या लढाईत तुम्ही माझ्याबरोबर निष्ठेने निर्धाराने राहणार आहात.

दाते पुढे म्हणाले, भविष्यात आपणाला कुठलाही त्रास होणार नाही याची मी सर्वांना ग्वाही देतो. हे सर्व आपल्याला संपवायचे असून त्यासाठी परिवर्तन करणे आवष्यक आहे. यापूर्वीच्या नेतृत्वाने जो आदर्श घालून दिला आहे त्या आदर्शावर वाटचाल करत पुन्हा शाहू, फुले, आंबेडकर, सेनापती बापट, अण्णा हजारे यांच्या विचारांवर तालुका आणण्याची जबाबदारी आपण सर्वजण घेऊ.

दाते म्हणाले, राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपल्यावर विश्वास टाकला. जिल्हयाचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे, डॉ. सुजय विखे यांनीही माझ्या उमेदवारीला होकार दिल्याचे दाते यांनी कृतज्ञतापूर्वक नमुद केले. ते पुढे म्हणाले, महायुती सरकारने गेल्या दोन वर्षात शेतकरी, महिला, युवकांसाठी फार मोठे काम केले आहे. मुलींसाठी पदवीपर्यंत मोफत शिक्षण देण्यात येत आहे. लाडकी बहिण योजनेबरोबरच संपूर्ण कर्जमाफी करण्याची घोषणाही करण्यात आल्याचे दाते यांनी सांगितले. शिवराज कदम यांनी सुत्रसंचलन तर आर. एस.कापसे यांनी आभार मानले.

### दाते यांच्याकडे विकासाचे व्हिजन

**काशिनाथ दाते हे तालुक्यातील सुसंस्कृत, सज्जन व सरळ स्वभावाचे नेतृत्व आहे. त्यांच्याकडे विकासाचे व्हिजन असून या निवडणूकीत ते विजयी होतील याची मला खात्री आहे.**

**मधुकर उचाळे, मा. सभापती जि. प.नगर**

### यांचा राष्ट्रवादीत प्रवेश

**पाबळ येथील नीलेश लंके प्रतिष्ठानचे अध्यक्ष शिवराज कदम यांच्यासह अंकुश कवडे, भरत गोरडे, संतोष कवडे,रवींद्र कापसे,बाबाजी कापसे, बन्सी साबळे, अशाक कापसे, बन्सी कवडे, महेश कवडे, राहुल कवडे, संतोष कवडे यांनी दाते यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला.**

# सुनेच्या प्रचारासाठी सासूबाई निवडणूकीच्या रणांगणात !

**निघोज : रोहन उनवणे**

**सासू-सुनेचे नाते हा भारतीय कुटुंब संस्कृतीतील अविभाज्य भाग आहे. हे नाते अतिशय संवेदनशील नाते मानले जाते. मुलगी लग्न करून सासरी जाते, त्यावेळी तिथे बऱ्याचदा सासू आईची भूमिका पार पाडत असते. सध्या विधानसभा निवडणुक प्रचाराने वातावरणात रंग भरला आहे. त्यातच पारनेर - नगरविधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीच्या उमेदवार राणीताई लंके यांच्यासाठी सासूबाई शकुंतलाबाई ह्या पदर खोचून निवडणूकीच्या रणांगणात उतरल्या आहेत. त्यातून मतदारांना सासू - सूनेच्या नात्याची सुंदर वीण पहायला मिळत आहे.**

जन्माला येईल ते नाते उत्तमच असत, त्याची जपणूक मात्र महत्त्वाची असते. त्यातल्या त्यात नाते तर जपलेच पाहिजे. पण दुर्दैवाने आज नात्यामध्ये दुरावा निर्माण होत आहे. संवेदना बोथट झाल्या आहेत. कुटुंबामधील सासु-सुनांच ‘सख्य’ तर सर्वश्रृत आहे. परंतु, पारनेर विधानसभेच्या निवडणुकीत सून राणीताई यांच्या प्रचारासाठी सासूबाई शकुंतलाबाई लंके यांनी कंबर कसली आहे, निघोज परिसरात हा सध्या चर्चेचा विषय बनला आहे.



जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या तसेच खासदार नीलेश लंके यांच्या सुविद्य पत्नी राणी लंके सध्या पारनेर - नगर विधानसभा मतदारसंघात उमेदवारी करीत असून लंके यांच्यासाठी मतदारसंघातील हजारो कार्यकर्ते व महिला भगीनी प्रचारासाठी जिवाचे रान करीत असून राणी लंके यांच्या सासूबाई शकुंतलाबाई लंके यांनी निघोज व परिसरातील गावात मंगळवारी दिवसभरात तब्बल तीन हजार पेक्षा जास्त मतदारांच्या गाठीभेटी घेत पायी पदयात्रा करीत प्रचाराची राळ उडवून दिली आहे. वयाच्या वयोवृद्ध मातोश्रीने प्रचार करीत उपस्थितांचे लक्ष वेधले आहे.

लंके कुटुंबातील सर्व सदस्य सध्या सकाळी आठ ते रात्री दहा वाजेपर्यंत राणीताई लंके यांचा प्रचार करीत असले तरी खासदार नीलेश लंके यांचे वडील ज्ञानदेव लंके गुरुजी व आई शकुंतलाबाई लंके यांच्या वयाचा विचार करता हा प्रचार त्यांना झेपेल का ही साशंकता त्यांनी फोल ठरवली असून तब्बल पंधरा तास दिवसभरात प्रचार करीत तरूणांनाही लाजवेल असे काम ते प्रचाराच्या माध्यमातून करीत आहेत. निघोज येथे शकुंतलाबाई लंके यांनी वीस ते बावीस महिलांना बरोबर घेऊन दिवसभरात तीन हजार पेक्षा जास्त मतदारांशी संपर्क साधला आहे. यावेळी लोकनेते निलेश लंके प्रतिष्ठान पदाधिकारी शिवाजीराव लंके, मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे विश्वस्त व खासदार नीलेश लंके यांचे कट्टर समर्थक ज्ञानेश्वर उर्फ बाळासाहेब लंके, ग्रामपंचायत सदस्या भावना साळवे, ग्रामपंचायत माजी सदस्या जया ढवळे या त्यांच्या समवेत होत्या.

**शकुंतलाबाई लंके यांनी उतरत्या प्रचाराची धुरा सांभाळली असून या वयातही न थकता न थांबता त्या सकाळी सात ते रात्री दहा वाजेपर्यंत पायी पदयात्रा माध्यमातून प्रचार करीत आहेत ही आमच्यासाठी प्रेरणादायी बाब आहे.**

**भावना साळवे**
**सदस्या , निघोज ग्रुप ग्रामपंचायत**

**खासदार नीलेश लंके यांचे सर्व कुटुंबीय ३६५ दिवस लोकांच्या सुखादु:खात सातत्याने सहभागी होत आहे. म्हणून प्रचाराच्या माध्यमातून मातोश्री शकुंतलाबाई लंके यांचे काम आजही आमच्या सारख्यांना स्फुर्तीदायी आहे.**

**जया ढवळे, माजी ग्रामपंचायत सदस्या निघोज ग्रुप ग्रामपंचायत**

‘पारनेर दर्शन’ हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून ‘पारनेर दर्शन’ कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com